**देवणी :-**



पशुपालकांनी सुमारे १०० ते १२५ वर्षापूर्वी देवणी आणि स्थानिक पशुंच्या संकरातून निर्माण केलेली महाराष्ट्रातील सर्वात देवणी पशुजात लातूर आणि बीदर जिल्हयात दिसून येते. बाळूक्यां, वानऱ्या आणि शेवरा या उपप्रकारात असणारी देवणी जातींची जनावरे 'वानऱ्या उपप्रकारात लोकप्रिय आहेत. दूध आणि शेतीकाम या उपयुक्ततेची देवणी जनावरे ठळक आणि भारदस्त माथा, लांब कानाच्या पाळया टोकाला वळलेल्या, चेहरा-भुवया-सडे -शेपटीचे केस- वृषण काळया रंगात तर तळ पायात पैजणाप्रमाणे काळा रंग अशा रचनेत दिसून येतात. देवणी जनावरांची शिंगे डौलदार आणि टोकास गोलाकार, गळयावर मांसल पोळी, भारदार वसवंड आणि शरीर कातडी जाड असणारी तर शेपूट लांब आणि पायापर्यंत ठेवणीची दिसून येतात. शांत आणि सहज हाताळता येणारी देवणी जनावरे १० ते १२ लिटर दिवसा काठी दूध उत्पादन आणि शेतीकामासाठी उत्कृष्ट क्षमता असल्याने सांभाळली जातात.



**लाल कंधार :-**

कंधार प्रांताचा राजा कंदहार याने विकसित केलेली पशुजात मराठवाडा विभागात सर्वदूर आढळते. लाल कंधार पशुधनाची नोंदणी केंद्र शासनाकडे सन १९८८ मध्ये करून घ्रेण्यात पशुसंवर्धन विभाग आणि आताचे वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचा सहभाग आहे. भारतीय पशुधनाच्या मुळ जातीत असणारी शेतीकामासाठी प्रसिध्द लाल कंधार जनावरे नांदेड, परभणी जिल्हयात प्रामुख्याने दिसून येतात. गायींचा तांबडा, विटकरी फिक्का रंग तर बैलांचा गडद तांबडा रंग यावरून ओळख असणारी लाल कंधार जनावरे मध्यम बांध्याची आणि काटक प्रकृतीमानाची असतात. या जनावरांत समान वक्राकार शिंगे, मध्यम वसवंड, मानेची मध्यम पोळी, काळया संडांची कास, सतेज डोळे, चमकणारी कातडी आणि काळया रंगाची दणकट खुरे अशी लक्षणे दिसतात. सुधारीत व्यवस्थापनात लाल कंधार गायी १० लिटर पेक्षा अधिक दूध दर दिवशी देतात हे सिध्द झाले असून परराज्यात शेतीकामासाठी बैलांना मोठी मागणी आहे.

**खिल्लार :-**



राज्याच्या नावलौकिकात दिमाखदार आणि देखण्या रूबाबात, संख्येच्या दृष्टीने इतर पशुधन जातींपेक्षा दसपट अधिक शुध्द जातींची खिल्लार जनावरे पश्चिम महाराष्ट्रात आढळतात. पांढरा शुभ्र रंग, अतिशय डौलदारी अणकुचीदार लांब शिंगे आणि सर्वोच्च भारोत्तालन म्हणजे वजन वाहक क्षमता ही खिल्लार जातींची प्रमुख वैशिष्टये आहेत. विविध पैदास धोरणात १२ उपजातीत विभागणी झालेली खिल्लार जनावरे धावण्याच्या शर्यती, पशुप्रदर्शने यातून आपली क्षमता सिध्द करतात. ऊस वाहतूक या प्रमुख कामासाठी खिल्लार बैलगाडया सर्वदूर दिसून येतात. चेहरा लांब व निमूळता, माथा शिंगाकडे वक्राकार, कानाच्या मध्यम आणि न झुकणाऱ्या पाळया, सरळ मजबत कडक पाय, मांसल वसवंड, लहान आकाराची कास आणि शरीराला चिकटलेली बेंबीची कातडी अशा रचनेत खिल्लार जनावरे असतात. दूध उत्पादन कमी असणारी खिल्लार जनावरे अलीकडच्या काळात विशेष प्रयत्नातून दूध उत्पादक करण्यासाठी विकसित करण्यात आली आहेत.

**डांगी :-**




अधिक पर्जन्यमान असणाऱ्या पूर्वीच्या 'डांग' प्रदेशातील डांगी जनावरे तेलकट मांसल त्वचा आणि पावसात शेतीकाम करण्यासाठी प्रसिध्द आहेत. नाशिक, इगतपूरी भागात या जातींची जनावरे सिमीत असून गीर आणि देवणी यांच्याशी शरीररचनेचे सार्धम्यपणा दाखवतात. गीर जातीशी शरीर रचना सारखेपणा तर देवणी जातीच्या शरीर रंगाचा सारखेपणा डांगी जानावरांत दिसून येतो. पांढऱ्या शरीरावर काळे अनेक ठिपके अशा डांगी जनावरांचे संवर्धन वर्षानुवर्षापासून होत आहे. मध्यम बांध्याची डांगी जनावरे भात शेतीसाठी आणि डोंगर पट्टयातील शेतीसाठी वापरली जातात. डांगी जनावरांच्या ६ उपजाती अहमदनगर जिल्हयात आढळतात या जनावरांच्या खुरांचा कडकपणा मजबूत पकडीसाठी जमिनीवर उपयोगाचा ठरतो. डांगी पशुवंश क्षमता गती आणि देखणेपणा यामुळे पशुपालकांकडून सांभाळल्या जातात आणि दुष्काळप्रवण परिस्थितीत त्यांचे संगोपण सहज शक्य होवू शकते. डांगी पशुधनाकडून कुटूंब मर्यादित पुरेसे दूध उत्पादन मिळू शकते.



**गवळऊ :-**

विदर्भ विभागाचे भूषण असणारी गवळऊ ही एकमेव पशुजात नागपूर आणि अमरावती विभागात दिसून येते. वर्धा या मुळ ठिकाणी शुध्द वंशाची काही जनावरे आज उपलब्ध असून राज्यातून जलद गतीने ऱ्हास होणाऱ्या गौवंशात गवळऊ जातीचा अग्रक्रम दिसून आला आहे. इतिहासात गवळऊ पशुधनाचा संदर्भ मराठी सैन्याने गौंड राज्य काबीज करण्यासाठी केला असल्याचे संदर्भ आहेत. दुहेरी उद्देशाने सांभाळली जाणारी मध्यप्रदेशातील गवळऊ जनावरे राज्यात मात्र शेतीकामासाठीच उपयुक्ततेची ठरतात. पांढरा आणि फिक्कट करडा रंग अंगभर दिसून येणारी गवळऊ मात्र चेहरा वक्राकार असल्याने वेगळेपणा दर्शवतात. या गौवंशाचा माथा सपाट आणि वरच्या बाजूस अरूंद व वळलेला असतो. लहान शिंगे आणि पाठिमागे वळलेली शिंगे अशा रचनेत मान, पोळी आणि वसवंड आखूड असणारी गवळऊ जनावरे आखूड शेपूट आणि सामान्य प्रकृतीमानात आढळतात. दूध उत्पादन क्षमता विकसीत करण्यासाठी आणि गौवंशाच्या संवर्धनासाठी गवळऊ बाबत शासकिय प्रयत्न सुरू आहेत.

**कोकण कपिला :-**



कोकणाच्या डोंगरीभागात भात शेतीसाठी आवश्यक असणारी जनावरे आकाराने अत्यंत खूजी तर रंगात गडदपणा दाखवत असल्याने त्यांना गीड्ड अशाच संबोधनात ओळखले जाते मात्र सर्व स्थानिक पशुधनाची सांख्याकी माहिती सादर करून कोकण कपिला अशी अधिकृत नोंदणी झालेली गौवंशाची जात संपूर्ण कोकण विभागात दिसून येते. पावसाळयात भात शेतीत पाण्यात औढ काम करणारी जनावरे आणि उन्हाळयात प्रतिकूल परिस्थितीत म्हणजे उष्ण हवामान व आर्द्रता असतांना डोंगर उतारावर असणाऱ्या गवतावर गुजरान करू शकणारी जनावरे अशी कोकण कपिलेची वैशिष्टये आहेत. सांभाळाच्या दृष्टीने दुर्लक्षित असली तरी उत्कृष्ट आरोग्य, रोगप्रतिकारक क्षमता आणि औषधी अल्पदूध उत्पादन असा गुण गौरव कोकण कपिला पशुधनास दिला जातो. याच गौवंशाच्या सारखेपणाची अनेक जनावरे गोवा आणि केरळ किनारपट्टी लगत दिसून येतात. कोकण कपिला गौवंशाच्या विकासासाठी आणि संवर्धनासाठी विशेष योजनांची गरज आहे.